**//प्रेस नोट//**

दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई हद्दीत दिनांक २८/०९/२०२६ रोजी रात्री ०२.०० वा ते ०२.४५ वा. चे दरम्यान फिर्यादी श्री. जलुभा सरुपसिंह जडेजा, वय ५३ वर्षे यांचे रहाते घरी ए/१०३, पहिला माळा, प्रथमेश एवेनु, दत्त मंदीर रोड, मालाड पुर्व, मुंबई येथे त्यांचे बिल्डींगच्या सभोवती बांधलेल्या बांबूच्या परांचीच्या सहाय्याने वर चढुन फिर्यादीचे हॉलला असलेल्या खिडकीतून घरात प्रवेश करुन बेडरुममधील लाकडी सेल्फवर ठेवलेली १) सोन्याची रुद्राक्षची जु. वा. ३० ग्रॅमची चैन किं.अं. ३,००,०००/— रुपये, २) रोख रक्कम ६५००/— रुपये (भारतीय चलनातील ५०० रुपयाच्या १३ नोटा) एकुण किंमत—३,०६,५००/— रुपये नमुद वर्णनाची व किंमतीची मालमत्ता एका अज्ञात इसमाने लबाडीच्या इराद्याने चोरी केली म्हणून फिर्यादी यांनी नमुद इसमाविरोधात कायदेशीर कारवाई होणेस तक्रार दिल्याने **दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई गु.र.क्र. १०६८/२६ कलम ३३१(४), ३०५ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

सदर गुन्हयात पोलीस ठाणे हद्दितील व खाजगी असे ५० ते ६० सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता एक संशयीत इसम चोरी केल्यानंतर भंगार उचलण्याचे काम करत असल्याचे दिसून आले. त्यानुसार मालाड पुर्व परिसरात भंगार उचलणारे इसम नामे ०१) झुबेर अन्सारी, २) शहराफत शेख यांच्याकडे नमुद गुन्हया संदर्भात चौकशी केली असता असे निष्पन्न झाले की, मीरा रोड परिसरात राहणारा व बोरीवली, कांदिवली, मालाड या परिसरात भंगार वेचणारा इसम नामे बहरूल नुरइस्लाम तरफदार, वय २७ वर्षे, रा.ठी. १५ नंबर बस स्टॉप जवळ झोपडपट्टी, मीरा रोड कोर्ट जवळ, मीरा रोड, ठाणे हा फुटेजमध्ये दिसत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानुसार स.पो.नि. ओम तोटावार हे गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या मदतीने मीरा रोड परिसरात जाऊन सदर इसमाचा शोध घेतला असता तो मिळून आला त्यास ताब्यात घेऊन दिंडोशी पोलीस ठाण्यास आणुन चौकशी करुन नमुद गुन्हा त्याने केला असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याला दिनांक ०२/१०/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपीताकडून गुन्हयात चोरीस गेलेली ३ तोळे सोन्याची रुद्राक्ष्याची माळ किंमत ३,००,०००/— व रोख रक्कम ६,५००/— अशी **एकूण ३,०६,५००/— रुपयांची १००% मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.**

सदर कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त श्री. शशीकुमार मीना सो॥, उत्तर प्रादेशिक विभाग, मा. पोलीस उप आयुक्त श्री. गजानन शिवलींग राजमाने सो॥, उत्तर परिमंडळ ०३, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. विजय भिसे सो॥, दिंडोशी विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडोशी पोलीस ठाणेचे वपोनि महेंद्र शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पो.नि. शरद सुर्वे, सपोनि ओम तोटावार, स.फौ. अनिल शिंदे, पो.ह.क्र. ९६०९३२/नवनाथ बोराटे, पो.ह.क्र. ०३.१२१५/अमित पंडीत, पो.ह.क्र. ०३.१३४२/निलेश सांबरेकर, पो.शि.क्र. ०९.२२२५/सागर तामकर, पो.शि.क्र. १४.०४६४/दिपक गायकवाड, पो.शि.क्र. १४.०७१०/उमेश बडगीरे यांनी पार पाडली.